**CNR NO- MHSO060007932021**

**नियमित दिवाणी दावा क्र.६१/२०२१**

**आय.ए.क्र.७/२०२२**

महेश साठे

**वि.**

**रंजन डोंबे व इतर.**

## नि. ८० वरील आदेश

## (घोषित दि. ०९/०९/२०२२)

०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१२ तर्फे दाखल करण्यात आलेला असून असे नमूद करण्यात आले की, नि.क्र.५५ व्दारे त्याने आपली कैफियत प्रतिज्ञापत्रासह दाखल केलेली आहे परंतु अनावधानाने कैफियतीवर त्यांची सही करण्याचे राहून गेले. सबब, कैफियत नि.क्र. ५५ वर सही करण्याची परवानगी देण्याबबात विनंती करण्यात आलेली आहे.

०२] वादीतर्फे सदर अर्जास प्रखर विरोध करुन असे नमूद करण्यात आले की, अर्ज कायदेशीर नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज खर्जासह नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१२ यांनी दि.१४/०१/२०२२ रोजी आपली कैफियत नि.क्र.५५ प्रतिज्ञापत्र नि.क्र.५६ सह सादर केलेली आहे ज्यावर माझे पदीय पुर्वाधिकारी यांनी सही करुन ती कैफियत वाचून दाखल करुन घेतलेली आहे. कैफियत नि.क्र.५५ वर प्रतिवादी क्र.१२ यांची स्वाक्षरी नसून केवळ त्यांचे विधिज्ञांची स्वाक्षरी आहे. परंतु प्रतिज्ञापत्र नि. क्र. ५६ चे अवलोकन केले असता दि.१४/०१/२०२२ रोजी सदरचे प्रतिज्ञापत्र प्रतिवादी क्र. १२ यांच्या स्वाक्षरीने याच न्यायालयातील अधिक्षकांकडे केलेले आहे. म्हणजेच दि.१४/०१/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.१२ न्यायालयात हजर होते व त्यांनी जरी प्रतिज्ञापत्र तयार केले तरी अनावधानाने नि.क्र.५६ वर स्वाक्षरी करण्याचे राहून गेले. अश्या परीस्थीतीमध्ये न्यायदानाच्या दृष्टीने विचार करता झालेली तांत्रीक चूक दुरुस्त करणे व प्रतिवादी क्र. १२ यांना कैफियतीवर स्वाक्षरी करण्यास परवानगी देणे न्यायोचित असल्याचे माझे मत झाले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ प्रतिवादी क्र.१२ यांना कैफियत नि.क्र.५५ वर आजरोजी स्वाक्षरी करण्याची परवानगी देण्यात येते.

३ उभयपक्षांनी याची नोंद घ्यावी.

AMIT ASHOKRAO KHANDALE

Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2022.09.09 17:50:54 +0530

दि.०९/०९/२०२२.

(अमित अ.खंडाळे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पंढरपूर.
**J.O.CODE-1828**

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | $2^{nd}$ Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 09.09.2022 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 09.09.2022 |
| Judgment/Order uploaded | | |
| on | : | 09.09.2022 |